मुंबई विद्यापीठ
क्र.वि.क / २७६ /२००९

# परिपत्रक

प्राचार्य / संचालक कला, संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषध निर्माणशास्त्र, व तत्सम महाविद्यालये, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रा. कृ. व्यंकटरमणी
कुलसचिव

स्थळ: - मुंबई
दिनांक: १५ जुलै, २००९

# महाराष्ट्र शासन

**उच्च न्यायालय प्रकरण**

क्र. अपंग २००९/प्र.क्र.५२/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १५ मे, २००९.

प्रति,
सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
सर्व संचालक,
कुल सचिव, सर्व विद्यापीठे,
मुंबई.

**विषय: - जनहित याचिका क्र. १३१/०६ व इतर जनहित याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे अपंग आरक्षणाबाबतचे आदेश.**

महोदय/महोदया,

दि. ३१.१२.२००८ अखेर अपंगासाठी उपलब्ध असलेली पदे ही दि.३१.१२.२००९ पर्यंत भरण्यात येतील असे प्रतिज्ञापत्र शासनाने मा. उच्च न्यायालयास सादर केलेले आहे. यास्तव अपंगासाठीची सदर राखीव पदे कोणत्याही परिस्थितीत दि. ३१.१२.२००९ पर्यंत भरणे बंधनकारक आहे. सबब, सदर प्रकरणी पुढे नमूद केल्यानुसार तातडीने कार्यवाही करुन आपला अहवाल शासनास पाठविण्यात यावा, जेणेकरुन मा. प्रधान सचिव यांना एकत्रित माहिती सादर करता येईल: -

१) अपंगाची पदे कोणत्याही परिस्थितीत दि. ३१.१२.२००९ पूर्वी भरली जातील याची दक्षता घ्यावी.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जाणारी पदे दि. ३१.१२.२००९ पूर्वी भरली जावीत यासाठी आयोगास आवश्यक असणारी माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी व मागणीपत्र सादर केल्याप्रमाणे पदे विहित मुदतीत भरली जातील यासाठी पाठपुरावा करावा.

३) मा. उच्च न्यायालयासमोर वादींनी अद्यापही काही संवर्गाचे अपंगासाठी पदनिश्चिती करण्यात आलेली नाही असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तेव्हा त्याप्रमाणे तातडीने तपासणी करावी व ज्या संवर्गाचे अद्यापही अपंगासाठी पदनिश्चिती आलेली नाही त्यासाठीचा प्रस्ताव तातडीने सामाजिक न्याय विभागास १० प्रतीत सादर केले करुन या प्रस्तावास तज्ञ समितीची मान्यता घेणे शक्य होईल.

सही/-
(बा. म. राऊत)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**